**MHKO120000802019**

## <u>निशाण क्रमांक ०५ खालील आदेश</u>.

अर्जदार यांनी सदरचा अर्ज वि.प. यांच्या विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेले आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार यांचा वि.प.क्र.१ यांचेशी दिनांक १२/०७/२००९ रोजी कसबा वाळवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे विवाह झाला आहे. वि.प.क्र.१ हे सैन्यदलात कार्यरत असल्यामुळे विवाहानंतर अर्जदार ह्या वि.प.क्र.१ यांचेसोबत त्यांचे नेमणूकीच्या ठिकाणी उधमपूर येथे नांदणेस गेल्या. तिथे गेल्यावर सुरवातीपासूनच वि.प.क्र.१ यांनी त्यांच्या चिडखोड स्वभावामुळे अर्जदार यांना विनाकारण शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरवात केली. वि.प.क्र.१ हे अर्जदार यांना त्यांच्या माहेरच्या माणसांबद्दल घालून पाडून बोलत असत व घरातून बाहेर काढणेची भाषा करत होते. सन २०११ व सन २०१५ मध्ये त्यांना आपत्यप्राप्ती झालेनंतर सुध्दा वि.प.क्र.१ यांच्या वागण्यामध्ये कोणताही फरक पडला नाही. त्यानंतर सन २०१६ मध्ये वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांना वि.प. यांच्या मुंबईमधील घरी राहावयास जाणेस सांगीतले. तिथे आल्यानंतर वि.प.क्र.२ ते ५ यांनी अर्जदार यांना भुतबाधा झाली असल्याचे उठवून डॉक्टरांकडे न दाखवता मांत्रिक बाईला बोलावून तिच्याकडून अर्जदार यांना मारहाण केली होती. तसेच, वि.प.क्र.२ ते ५ हे अर्जदार यांना मतिमंद, मेंटल अशा शब्दांमध्ये हिणवत होते व अर्जदारांना मारहाण व शिवीगाळ करत होते. त्यांनतर सन जून २०१८ मध्ये वि.प.क्र.१ यांनी स्वतः अर्जदार व लहान मुलगा समीप यांना त्यांच्या माहेरी सोडले आहे.

०३. अर्जदार पुढे कथन करतात की, वि.प.क्र.१ यांनी दिनांक २८/०८/२०१८ रोजी त्यांच्या वकीलांमार्फत खोटी कथने करुन अर्जदारांनी त्यांचेकडे नांदणेस येणे बाबत नोटीस पाठवली. अर्जदार यांनी सदर नोटीसला दिनांक १४/०९/२०१८ रोजी समर्पक उत्तर पाठवून त्यांची नांदणेस येणेची इच्छा असलेबाबत कळवले. मात्र वि.प.क्र.१ यांनी त्यांना नांदणेस नेले नाही व तेंव्हापासून वि.प.क्र.१ यांनी अर्जदार व मुलगा समिप यांची

रहाणेची, उदरनिर्वाहाची, ओषधपाण्याची अथवा कपडालत्त्याची कोणतीही चौकशी केलेली नाही. त्यानंतर, वि.प.क्र.१ व २ यांनी मध्यस्थांमार्फत वाद मिटवला व अर्जदार यांना व्यवस्थित नांदवतो असे सांगून दिनांक ३०/०९/२०१८ रोजी पुन्हा त्यांचे मुंबई येथील घरी नांदावयास नेले. मात्र त्यानंतर सुध्दा वि.प.क्र.१ ते ३ यांनी अर्जदार यांना किरकोळ कारणांवरुन शिवीगाळ व मारहाण केली व दिनांक २६/११/२०१८ रोजी वि.प.क्र.१ ते ५ यांनी अर्जदार यांना त्यांच्या माहेरी सोडले आहे. अशा प्रकारे वि.प. यांनी अर्जदार यांचा शारीरीक-मानसिक छळ केला आहे.

०४. अर्जदार पुढे कथन करतात की, त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व वि.प.क्र.१ यांनी पती या नात्याने अर्जदारांची कोणतीही जबाबदारी ने घेता जाणूनबुजून त्यांचेकडे दुर्लक्ष केले आहे व अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची, कपडालत्त्याची व दैनंदीन गरजांची अजातागायत कोणतीही चौकशी केलेली नाही. तसेच, अर्जदारांना त्यांच्या मुलांपासून विभक्त ठेवून त्यांना भेटू दिलेले नाही. याउलट, वि.प.क्र.१ यांची आर्थिक परिस्थिती खूप चांगली असुन त्यांचे मुंबई येथे स्वतःचे घर आहे. तसेच, वाळवे, ता. राधानगरी येथे घर व शेती असुन दुचाकी व चारचाकी गाडी आहे. वि.प.क्र.१ हे सैन्य दलातून स्वेच्छानिवृत्त झाले असुन त्यांना दरमहा र.रु.३०,०००/- इतकी पेन्शन मिळते. त्यामुळे वि.प.क्र.१ यांचेकडून अर्जदार यांना त्यांचे उदरनिर्वाहाकरीता व दैनंदीन गरजांपोटी आर्थिक सहाय्य म्हणून दरमहा र.रु.१०,०००/- प्रमाणे अंतरिम पोटगी मंजूर होणेबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे.

०५. वि. प. क्र.१ ते ५ यांनी सदर अर्जास निशाण क्र.२९ वर आपले म्हणणे सादर करुन अर्जदार यांची सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत. वि.प. यांच्या म्हणण्यानुसार, विवाहानंतर वि.प.क्र.१ व अर्जदार हे मसूरी व दिल्ली येथे फिरावयास गेले असता, अर्जदार यांनी वि.प.क्र.१ यांना " *मला तुमचे स्थळ पसंत नव्हते, मी आई वडीलांच्या ईच्छेखातर तुमच्या सोबत लग्न केले आहे* " असे सांगतले. त्यानंतर वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांना समजावून घरी आणले. सुरवातीस अर्जदार या वि.प.क्र.१ यांच्या आई वडीलांसोबत रहात होत्या. त्यावेळी त्या घरातील कोणतेही काम करत नव्हत्या व दिवसभर एकट्या बसत होत्या. तसेच, त्या सासु-सासऱ्यांशी उध्दट बोलणे, सतत वादविवाद करणे असे प्रकार करत होत्या. सन २०१० मध्ये वि.प.क्र.१ यांनी अर्जदारांच्या हट्टाखातर उधमपूर येथे नेले. तद्नंतर अर्जदार यांना दिवस गेले नंतर वि.प.क्र.१ यांनी मिलिटरी हॉस्पीटल मध्ये त्यांचे सर्व उपचार करत होते. मात्र अर्जदार यांनी बाळंतपणासाठी माहेरी

जाणेचा हट्ट धरला व त्या माहेरी निघुन गेल्या. त्यानंतर दिनांक १८/०९/२०११ रोजी पहिला मुलगा सिध्दांतच्या जन्मानंतर अर्जदार यांनी वि.प.क्र.१ यांचेकडे त्यांचेसोबत येण्याचा हट्ट धरला व वि.प.क्र.१ यांच्या आई वडीलांसोबत राहण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे वि.प.क्र.१ हे अर्जदार यांना नोकरीच्या ठिकाणी घेवून गेले. तिथे गेल्यानंतर अर्जदारांचा विक्षिप्तपणा जास्तच वाढला व त्या वि.प.क्र.१ यांचेसोबत किरकोळ कारणांवरुन वादविवाद करुन वारंवार माहेरी जावू लागल्या. या बाबत वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांना वारंवार समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार यांनी वि.प.क्र.१ यांचेसोबत भांडणतंटा करुन वि.प.क्र.१ यांचा मानसिक छळ केला आहे.

०६. वि.प. पुढे कथन करतात की, वि.प.क्र.१ यांच्या धाकटा भाऊ संदेश वाडेकर ह्याच्या लग्नामध्ये, अर्जदारने सर्व नातेवाईकांचे समोर वि.प.क्र.१ यांचे वडीलांवर सोन्याचा हार चोरल्याचा खोटा आरोप करुन विवाह सोहळ्याचे आनंदी वातावरण नैराश्यपूर्ण केले होते. त्यामुळे वि.प. यांच्या कुटुंबीयांच्या नात्यामध्ये दुरावा निर्माण झाला. असे असताना सुध्दा वि.प.क्र.१ हे मुलगा सिध्दांतच्या भविष्याचा विचार करुन अर्जदारांसोबत मनामध्ये कोणताही द्वेश न ठेवता संसार करत होते. त्यानंतर सन २०१५ मध्ये अर्जदारांच्या दुसऱ्या बाळंतपणामध्ये वि.प.क्र.१ यांचे आईने सर्व सेवा-शुश्रुषा केली आहे. तरीसुध्दा अर्जदार ह्या वि.प.क्र.१ यांचे आई वडीलांसेबत सतत वाद घालून माहेरी गेल्या. तेव्हा वि.प.क्र.१ यांनी मध्यस्थांमार्फत अर्जदार यांना पुन्हा नांदायला आणले. त्यानंतर, अर्जदार यांचा विक्षिप्तपणा खुपच वाढला व त्या आक्रामक वागू लागल्या, त्यामुळे त्या सतत चिडचिड करणे, घरातील कोणतेही काम न करणे, घरातील वस्तुची आदळाआपट करणे, वि.प.क्र.१ यांना मारणेसाठी त्यांचे आंगावर धावून जाणे, शिवीगाळ करणे, मुलगा सिध्दांतला मारहाण करणे तसेच स्वतःच्या जिवाचे बरेवाईट करुन घेईन अशी धमकी देणे असे प्रकार अर्जदार करत होत्या. याबाबत वि.प.क्र.१ यांनी चौकशी केली असता अर्जदार यांना सुरुवातीपासुन मानसिक आजार असलेची माहिती त्यांना मिळाली. तेंव्हा वि.प.क्र.१ यांना मोठा मानसिक धक्का बसला. तेंव्हा वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांचा औषधोपचार करण्याचा प्रयत्न केला असता अर्जदारांनी त्यांचे माहेरी उपचार चालू असल्यामुळे तेथूनच औषधोपचार घेते असा आग्रह धरला व त्या त्यांचे आई वडीलांसोबत त्यांचे माहेरी निघुन गेल्या.

०७. औषधोपचारानंतर अर्जदार या वि.प.क्र.१ यांचेकडे नांदणेस येणेस टाळाटाळ करु लागल्या. याबाबत वि.प.क्र.१ यांचे आई वडीलांनी विचारले असता अर्जदार

यांनी त्यांना वि.प.क्र.१ यांचेसोबत नांदायचे नाही, मी तुमच्या घरी येणार नाही, मी माहेरीच राहणार व तुमच्या मुलाच्या नोकरीच्या ठिकाणी जावून तक्रार करुन त्याला तुरुंगात पाठवणार अशी धमकी दिली. तसेच, कोणतेही कारण नसताना दिनांक २५/०९/२०१६ रोजी अर्जदार यांनी वि.प.क्र.१ यांचे विरुध्द कांजुरमार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दिली. असे असताना सुध्दा वि.प.क्र.१ हे अर्जदार यांची काळजी घेत होते व त्यांना औषधोपचार मुंबईमध्येच घेण्याचा आग्रह करत होते. मात्र अर्जदार ह्या त्यांच्या माहेरी जावून राहिल्या. तेंव्हा नाईलाजास्तव वि.प.क्र.१ यांनी त्यांचे वकीलामार्फत दिनांक १४/०९/२०१८ रोजी अर्जदार यांना नांदणेस येणसाठी नोटीस पाठवली असता अर्जदार यांनी त्याला खोटे व चुकीचे उत्तर पाठविले व फौजदारी केस करण्याची धमकी दिली. त्यानंतर वि.प.क्र.१ यांनी स्वतः तडजोड करुन अर्जदार यांना पुन्हा नांदणेस घेवून आले व संसाराकडे पूर्ण वेळ लक्ष देणेसाठी नोकरीतून सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यानंतर, सुध्दा अर्जदार यांचे वागण्यात कोणताच फरक पडला नाही व त्या घरातील कोणतेही काम न करता वि.प.क्र.१ यांचेशी नेहमी वाद करत होत्या. त्यामुळे, वि.प.क्र.१ यांनाच घरातील सर्व कामे करावी लागत. याबाबत दिनांक २२/११/२०१८ रोजी मुरगुड येथील पांडूरंग भाट यांचे घरी इतर मध्यस्थींच्या उपस्थितीमध्ये अर्जदार यांचे आई वडील व वि.प. यांचेमध्ये चर्चा झाली असता, अर्जदार यांनी " *मला संसार करायला जमणार नाही. मला डॉक्टर इंजिनियर मुलगा पाहिजे होता* " असे सांगीतले व स्वतः व मलांना विष पाजून जीव देण्याची धमकी दिली. वि.प. पुढे कथन करतात की, त्यांनी अर्जदारांचा कोणत्याही प्रकार छळ केलेला नाही. तसेच, वि.प.क्र.१ त्यांना मिळत असलेल्या पेन्शनवर त्यांचा व त्यांच्या कुटूंबीयांचा चरितार्थ चालवतात व स्वतःचा औषधोपचार घेतात. अर्जदार ह्या स्वेच्छेने दिनांक २२/११/२०१८ पासून माहेरी राहत आहेत. त्या सुशिक्षित असुन त्या त्यांच्या वडीलांच्या शेतातून भरघोस उत्पन्नही मिळवत आहेत. तसेच, त्या त्यांचे वडीलांच्या हॉस्पीटलचे व्यवस्थान सांभाळून तिथूनही चांगले उत्पन्न मिळवत आहेत. त्यामुळे त्या पोटगी मिळणेस पात्र नाहीत. तसेच, अर्जदार यांचा वि.प.क्र.१ यांनी कोणत्याही प्रकारचा छळ केलेला नसल्यामुळे त्या कोणत्याही नुकसान भरपाई मिळणेस पात्र नाहीत. या सर्व कारणांमुळे वि.प. यांनी सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०८. प्रकरणामधील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०९. अर्जदार यांनी त्यांचे कथनांच्या पृष्ठर्थ निशाण क्र.३ सोबत, वि.प.क्र.१ यांनी

वकीलामार्फत त्यांना पाठविलेल्या नोटीसची प्रत, सदर नोटीसला त्यांनी दिलेल्या उत्तराची प्रत जोडली आहे. वि.प.क्र.१ यांनी त्यांचे कथनांच्या पृष्ठर्थ निशाण क्र.२५ सोबत, हि.वि.अर्ज क्र.२९/२०१९ मधील रोजनामा प्रत, सदर प्रकरणातील अर्जदार यांना पाठविण्यात आलेल्या नोटीसची प्रत, बेलीफ यांचा अहवाल प्रत, वि.प.क्र.१ यांनी वकीलामार्फत अर्जदारांना पाठविलेल्या नोटीसची प्रत, सदर नोटीसला अर्जदारांनी दिलेल्या उत्तराची प्रत जोडली आहे. तसेच, वि.प.क्र.१ यांनी निशाण क्र.३४ सोबत, मुलगा समिप वाडेकर याचे शाळेबाबतची कागदपत्रांची प्रत, अर्जदार यांचे मानसोपचारतज्ञांकडून घेतलेल्या औषधोपचाराबाबतचे व उपचारासंबंधीची कागदपात्रांची प्रत, अर्जदार यांचे आरोग्य विमाचे ओळखपत्राची प्रत, मुलाच्या शैक्षणिक फी भरलेच्या पावत्यांची प्रत, वि.प.क्र.१ यांचेवर होणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या पावत्यांची प्रत, प्रकाश भाट यांचे शेतीचा ८-अ उताऱ्याची प्रत जोडली आहे. तसेच, वि.प.क्र.१ यांनी निशाण क्र.३९ सोबत, वि.प.क्र.१ यांना मिळणाऱ्या पेन्शन स्लीपची प्रत, अर्जदार यांनी वि.प.क्र.१ यांचे विरुध्द दाखल केलेल्या तक्रारीची प्रत, म. सं. कौ. हि. का. अर्ज क्र. ०६/२०२० ची प्रत, वि.प.क्र.१ यांचे जीवन विमा पॉलीसीच्या प्रत दाखल केलेल्या आहेत. तसेच, संरक्षण अधिकारी, भुदरगड यांचा कौटुबिंक घटना अहवाल निशाण क्र.४१ वर आहे. तसेच, अर्जदार व वि.प. यांचेतर्फे दाखल अनुक्रमे निशाण क्र.३५ व ३६ वरील लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले.

१०. अर्जदाराच्या विधिज्ञांतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, विवाहानंतर वि.प. क्र.१ यांनी अर्जदार यांना शारिरीक व मानसीक त्रास दिला व त्यांचा कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय त्याग केला. याउलट वि.प. तर्फे विधिज्ञांनी, वि.प.क्र.१ यांनी अर्जदार ह्या चिडखोर स्वभावाच्या असुन त्या मानसीक आजारी असल्यामुळे अर्जदार हीने स्वतःहून त्यांचा त्याग केला आहे व चुकीचे व लबाडीचे अर्ज दाखल केले असल्याचा प्रतियुक्तीवाद केला.

११. सकृतदर्शनी संरक्षण अधिकारी, गारगोटी यांच्या अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार व जाबदार यांचा विवाह झाला असुन सदर विवाहसंबधामधून त्यांना दोन अपत्य आहेत व सदरची बाब वि.प. क्र.१ यांनी नाकरलेली नाही. तसेच, संरक्षण अधिकारी, गारगोटी यांच्या अहवालाचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी वि.प. क्र. १ ते ५ यांनी विवाहानंतर अर्जदार यांना शारिरीक व मानसीक त्रास दिला असल्याचे दिसुन येते.

१२. अर्जदार यांच्या कथनांनुसार वि.प. यांनी अर्जदार यांचा शारीरीक-मानसिक

छळ करुन मध्ये त्याग केल्यामुळे अर्जदार सन नोव्हेंबर २०१८ पासून त्यांचे माहेरी रहात आहेत. तसेच, पती या नात्याने अर्जदारांची कोणतीही जबाबदारी ने घेता जाणूनबुजून त्यांचेकडे दुर्लक्ष केले आहे व अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची, कपडालत्त्याची व दैनंदीन गरजांची अजातागायत कोणतही चौकशी केलेली नाही. याउलट, वि.प. यांचे कथनांनुसार, अर्जदार यांना सुरुवातीपासुन मानसीक आजार होता व वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांचा औषधोपचार करण्याचा प्रयत्न केला असता अर्जदारांनी त्यांचे माहेरी उपचार चालू असल्यामुळे तेथूनच औषधोपचार घेते असा आग्रह धरला व स्वतः वि.प. व मुलांचा त्याग करुन त्या स्वेच्छेने सन नोव्हेंबर २०१८ मध्ये त्यांचे आई वडीलांसोबत माहेरी निघुन गेल्या. त्यांनतर, वि.प. यांनी त्यांना पुन्हा नांदणेस आणणेसाठी प्रयत्न करुनही त्या नांदणेसाठी आल्या नाहीत.

१३. निशाण क्र.२५, अ.क्र.६ व ७ वर दाखल केलेल्या पोलीस ठाणे, राधानगरी यांचेकडील प्रथम खबर अहवालांचे अवलोकन केले असता, सकृतदर्शनी अर्जदार यांनी वि. प. यांनी परस्पर विरोधात तक्रार दिली असल्याचे दिसुन येते. तसेच, सकृतदर्शनी वि.प. यांनी अर्जातील कथने अमान्य केली असली तरी, सदरची बाब ही दोन्ही बाजूचा पूरावा ऐकल्यानंतर स्पष्ट होईल. सकृतदर्शनी अर्जदार ह्या सन नोव्हेंबर २०१८ पासुन त्यांचे माहेरी रहात असल्याचे दिसुन येते. तसेच, सकृतदर्शनी, संरक्षण अधिकारी, भुदरगड यांचे कडील कौटुंबिक घटना अहवालाचे अवलोकन केले असता, विवाहानंतर वि.प. क्र.१ ते ५ यांनी अर्जदार यांना शारिरीक, मानसीक त्रास दिला असल्याचे अहवालावरुन दिसुन येते. तसेच, शिवीगाळ करणे, मारहाण करणे, अर्जदार यांच्या गरोदरपणात वैद्यकीय मदत न करणे, मुलांची काळजी न घेणे अशी गैरकृत्ये केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. या सर्व बाबींचा विचार करता, शारिरीक व मानसिक त्रास देणे ही बाब कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यातील तरतुदी नुसार ***घरगुती हिंसाचार*** या प्रकारात मोडते. जरी, वि.प. क्र.१ यांनी अर्जदार यांच्या सर्व कथनांचा इन्कार केला असला तरी, पत्नीचा सांभाळ करणे हे पतीचे नैतीक व कायदेशीर कर्तव्य आहे. तसेच, त्यांच्या अन्न, वस्त्र व निवा-याची सोय करणे याची सुध्दा जबाबदारी पतीवर येते. मात्र वि.प. क्र.१ यांनी या सर्व कर्तव्यांकडे दुर्लक्ष केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते व अर्जदार यांची पालनपोषणाची सोय केल्याचे दिसुन येत नाही.

१४. अभिलेखावर दाखल करण्यात आलेल्या निशाण क्र.३९, अ. क्र.१ वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सकृतदर्शनी वि.प.क्र.१ यांना र.रु. २४९५१/- इतकी

रक्कम पेन्शन म्हणून मिळत असल्याचे दिसुन येते. सदरची बाब वि.प.क्र.१ यांनी नाकारलेली नसल्यामुळे त्यांचेकडे योग्य प्रमाणात उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसुन येते. याउलट, वि.प. क्र.१ यांनी निशाण क्र. ३४ कडे दाखल केलेल्या कागदपत्रांचा आधार घेवून वि.प.क्र.१ हे त्यांचे मुलांचे शाळेचा खर्च ते स्वतः करत असल्याचे कथन केले आहे. तसेच, अर्जदार ही शिक्षीत असल्यामुळे तिला पोटगी मागता येणार नसल्याचा युकतीवाद वि.प. तर्फे करण्यात आला. सकृतदर्शनी, जरी वि.प. हे मुलाचे शाळेचा व इतर खर्च करत असले तरी पत्नीचा सांभाळ करणे व तिच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करणे हे देखील पतीचे नैतीक व कायदेशीर कर्तव्य आहे. केवळ पत्नी शिक्षीत आहे या कारणावरुन तिला पोटगी नाकारणे हे सकृतदर्शनी न्यायोचित ठरणार नाही. तसेच, वि.प. यांनी अर्जदार हीला वैयक्तीव व नियमित उत्पन्नाचे साधन असल्याचे कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही.

१५. त्यामुळे, एकंदरीतपणे सकृतदर्शनी उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार, जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती, उभयपक्षकारांचे राहणीमान, महागाई तसेच, अर्जदार यांना त्यांच्या दैनंदीन जिवनासाठी येणारा खर्च या सर्व बाबी विचारात घेता अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ३,५००/–(तीन हजार पाचशे रुपये फक्त) प्रमाणे अंतरिम पोटगी आदेशीत करणे न्यायीक ठरेल. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. अर्ज निशाण क्र. ५, अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प.क्र.१ यांनी अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार यांना दरमहा र. रु. ३,५००/- (रुपये तीन हजार पाचशे मात्र) इतकी रक्कम अंतरीम पोटगी म्हणून द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, भुदरगड यांना पाठविण्यात यावी.

Digitally signed by Amit Sunil Koshti
Date: 2020.11.12 12:58:59 +0530

स्थळ : गारगोटी. **( अ. सु. कोष्टी )**
दिनांक : १२/११/२०२०. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, गारगोटी.